

ताराराणी विद्यापीठाचे संस्थापक व्ही. टी. पाटील यांच्या ८९ व्या वाढदिवसानिमित्त झालेल्या समारंभात त्यांना दीड लाख रुपयांची थैली 'सकाळ' कोल्हापूरचे कार्यकारी संपादक अनंत दीक्षित यांच्या हस्ते देण्यात आली. शेजारी डॉ. क्रांतीकुमार पाटील, शां. कृ. पंत वालावलकर, रा. कृ. कणबरकर.

# राष्ट्रीयस्तरावर महिलांसाठी ताराराणी पुरस्कार : व्ही. टी. पाटील

**कोल्हापूर, ता. ७- राष्ट्रीय स्तरावर विविध क्षेत्रात कर्तृत्व गाजविणाऱ्या महिलांसाठी ताराराणी पुरस्कार देण्याची योजना ताराराणी विद्यापीठाचे संस्थापक अध्यक्ष व्ही. टी. पाटील यांनी आज जाहीर केली. त्यांच्या ८९ व्या वाढदिवस समारंभात ते बोलत होते. ताराराणी विद्यापीठ परिवाराच्यावतीने श्री. पाटील यांना आज दीड लाखाचा निधी 'सकाळ'चे कार्यकारी संपादक अनंत दीक्षित यांच्या हस्ते देण्यात आला. या निधीत स्वतःचे एक हजार रुपये घालून श्री. पाटील यांनी सर्व निधी ताराराणी पुरस्कारासाठी श्रीमती सरोजिनी शिरगोपीकर यांच्याकडे दिला. ताराराणी पुरस्कार योजनेचा सर्व तपशील लवकरच निश्चित करावा, असेही श्री. पाटील यांनी यावेळी सुचविले.**

आज सकाळी ताराराणी विद्यापीठ परिसर श्री. पाटील ऊर्फ काकाजींच्या जयघोषाने दुमदुमून गेला. यानंतर झालेल्या समारंभात बोलताना ते म्हणाले, 'महाराष्ट्रात ताराराणी महिला विद्यापीठ होण्याची अत्यंत आवश्यकता आहे. ते विद्यापीठ निर्माण करण्यासाठी यापुढे मी अविरत प्रयत्न करेन.'

ताराराणीवर कादंबरी लिहिण्यासाठी लेखक स्वतः होऊन पुढे येत नाहीत, याबद्दल श्री. पाटील यांनी यावेळी खंत व्यक्त केली.

श्री. पाटील यांच्या कामगिरीचा आदरपूर्वक उल्लेख करून प्रमुख पाहुणे श्री. दीक्षित म्हणाले, 'शिक्षणाशी संबंधित अनेक प्रश्नांची चर्चा आज विविध पातळ्यांवर होत आहे. या सर्व चर्चेकडे विद्यार्थ्यांनी लक्ष ठेवले पाहिजे. त्याचप्रमाणे थोरामोठ्यांचे आदर्श पाहून किमान एक समर्थ व्यक्ती म्हणून आपण समाजात उभे राहिले पाहिजे. ताराराणी एखादीच होईल. परंतु ताराराणीची दिशा मात्र सर्वांनी जाणीवपूर्वक समजून घेतली पाहिजे.'

या समारंभात उद्योगपती तात्यासाहेब तेंडुलकर यांचेही भाषण झाले. ज्येष्ठ रसिकाग्रणी मदनमोहन लोहिया, शिवाजी विद्यापीठाचे माजी कुलगुरू रा. कृ. कणबरकर, अप्पासाहेब जाधव, प्रा. पाडगावकर, शेवडे गुरुजी आदींनी काकाजींचे अभीष्टचिंतन केले.

कमला कॉलेजचे प्राचार्य क्रांतिकुमार पाटील यांनी प्रास्ताविक केले. प्रा. वरदा माडगूळकर यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. माधुरी टंकसाळे यांनी आभार मानले.

संस्थेच्या उषाराजे हायस्कूलच्यावतीने मुख्याध्यापिका सरोजिनी शिरगोपीकर यांनी पूरग्रस्तांसाठी 'सकाळ' रिलीफ फंडास एक हजार एक रुपयांचा निधी श्री. दीक्षित यांच्याकडे दिला. **(छायाचित्र पान ७ वर)**

दैनिक सकाळ दि. ८।८।८९